म. ग्रं. सं. ठाणे
विषय मै-प्रकार
सं. क्र. २८३

# श्री महालक्ष्मी



REFBK 0011389
REFBK-0011389

लेखक : सदानंद चेंदवणकर • मूल्य २५ नये पैसे

REFBK-0011389

# श्री शांतादुर्गा



मुद्रक व प्रकाशक :–ना. द. रंगे, मोहनप्रिंटरी ११ कावसजी पटेल स्ट्रीट,
फोर्ट मुंबई नं. १.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
[redacted] ........................ वि: ........
दि: ..........

# मुंबापुरीची धनदेवता महालक्ष्मी

मुंबई बेटाच्या पश्चिम किनाऱ्यावर चर्चगेटपासून सुमारें पांच मैलावर हिंदूंचे एक परम पवित्र देवस्थान आहे. हें देवस्थान अरेबियन समुद्राला लागूनच असलेल्या एका टेकडीवर वसलेलें असून त्या टेकडीवरून सभोंवतालची निसर्गशोभा नयनरम्य वाटते. लांबच लांब दूरवर पसरलेला तो अथांग सागर, त्यावर सदान् कदा उसळत असणाऱ्या त्याच्या त्या उर्मी, सूर्योदय नि सूर्यास्ताच्या सुमारास वाहाणारा तो शितल आल्हादकारक पवन या साऱ्या गोष्टींमुळें कोणत्याही ऋतूंत नि कोणत्याही वेळीं तिथें गेलेल्या रसिकाला तेथून हलूच नये असें वाटतें. दुःखी कष्टी झालेल्या जीवांना येथें आल्यानें क्षणभर तरीं कां होईना आपल्या साऱ्या दुःखाचा विसर पडतो आणि रोग्यांना येथलें हवापाणी नि वातावरण प्रसन्नदायक वाटतें म्हणून हवापालटण्यांसाठीं ते येथें येतात. अशा या टेकडीवर एकुलत्या एका देवतेची सत्ता आहे तिचें नांव आहे देवी महालक्ष्मी. मुंबापुरीतील सारे भक्त नि भाविक जिचा वारंवार उदो उदो करून महिमा गातात तीच ही देवता.

या महालक्ष्मी देवतेची स्थापना या टेकडीवर निश्चित कोणत्या साली झाली याची माहिती उपलब्ध नसली तरी इ. स. १७६१ ते १७७१ या दरम्यान केव्हांतरी तिची प्रतिष्ठापना तिथें झाली असली पाहिजे असें विद्वानाचें मत आहे. या देवीचें हें देवालय मुंबापुरीतील हिंदूंचें सर्वांत जुनें देवालय म्हणून समजलें जातें व तें वरळीचा बांध घातल्यानंतरच बांधले गेलेलें आहे.

## प्रभू गृहस्थांस झालेला दृष्टांत

इ. स. १७६० सालची गोष्ट असावी. त्यावेळीं हॉर्नबी नांवाच्या गोऱ्या राज्यपालाची मुंबई शहरावर सत्ता होती. या हॉर्नबी साहेबानें असें

ठरविलें कीं, वरळी गांव नि त्याच्या आसपासचीं ठिकाणें हीं सारीं मुंबईशीं जोडून पक्की गाडीवाट करावी व त्यासाठीं वरळीच्या समुद्राला किनारा किनाऱ्यानें पक्का बांध बांधला पाहिजे असें त्याला दिसून आलें. आपली ही कल्पना प्रत्यक्षांत आणण्यासाठीं त्यानें बांध घालण्याचें काम कांहीं ठेकेदारां-करवीं सुरू केलें. परंतु पाण्याचा अतिशय जोर म्हणा किंवा आणखीन दुसरें कांहीं म्हणा, केलेलें बांधकाम कोसळून पडत असे. कांहीं केल्या तें बांधकाम म्हणून टिकेना. या पायीं बरेंचसें श्रम नि पैसा खर्च झाला होता. अखेरीस हॉर्नबीनें कंटाळून ही बांधकामाची योजना तशींच सोडून देण्याचें ठरविलें. तेव्हां याच सुमारास सरकारी ठेकेदारांच्या यादींत नांव असलेले रामजी शिवजी नांवाचें एक सुशिक्षित प्रभु ठेकेदार गव्हर्नरकडे जाऊन म्हणाले, "काल रात्रीं माझ्या स्वप्नांत देवी महालक्ष्मी आली होती. तिची आणि तिच्या दोन बहिणींच्या मूर्ति समुद्राच्या पाण्यांत आहेत. त्या काढून त्यांचें देऊळ बांधलें तर आपला हा बांध पुरा होईल असें देवीनें मला दिलेल्या दृष्टांतात कथन केलें आहे. तर त्याप्रमाणें त्या मूर्ति शोधून काढून मी त्यांचें देऊळ बांधू काय ?" त्यावर गव्हर्नरनें रामजी शिवजीस ह्या कामीं संमति दिली.

## मूर्ति सांपडल्या

त्यानुसार रामजी प्रभुनें समुद्रांत जाळें टाकलें आणि मोठ्या आश्चर्याची गोष्ट त्या जाळयांत दगडाच्या तीन मूर्ति लागल्या, रामजीनें जाळयांतल्या त्या पाषाणमूर्ति ओढून घेतल्या. परंतु कोणत्याही प्रकारें त्या जाळयाची नुकसानी झाली नाहीं किंवा तें तुटलें नाहीं. ज्याठिकाणीं या मूर्ति त्यांच्या हातीं लागल्या त्याच ठिकाणीं रामजींनीं त्यांची स्थापना केली आणि वरळीचें बांधकाम सुरू केलें. यानंतर मात्र बांधाचे काम पूर्ण करण्यांत कांहीही व्यत्यय आला नाहीं. ठराविक मुदतींत त्यांनीं तें पुरें केलें आणि या बांधांचे नांव 'हॉर्नबी व्हेलार्ड' असें ठेवण्यांत आलें. तें आजतागायत कायम आहे.

रामजी प्रभूने बांधकाम करतांना केलेल्या श्रमांत जो कांहीं पैसा मिळविला त्या पैशांचें त्यांनीं या देवीचे सुंदरसे देऊळ बांधलें. तेंच

आजचें हें महालक्ष्मीचे मंदिर होय. या कामीं सरकारकडून त्यांनीं ही जागा बक्षिस मिळविली. या देवळाच्या कामीं ८०००० रुपये खर्च झाले असावेत असा अंदाज आहे. देवळाच्या बांधणीनंतर एका सोनाराने नि कोळयानें देवळाच्या नजिकच एक धर्मशाळा बांधली ती अजूनही अस्तित्वांत आहे. असें म्हणतात की ही महालक्ष्मी नि तिच्या दोन बहिणी महाकाली व महासरस्वति यांच्या मूर्ति बऱ्याच वर्षांपूर्वीपासून तिथे होत्या. मुसलमानांचे अमदानीत या मूर्तिंची खूपच नासधूस झाली. अखेरीस अधिक नासधूस होऊ नये म्हणून त्यानी जलसमाधि घेण्याचे ठरविलें. मुंबई बेट पोर्तुगीजांकडून इंग्रजांकडे येईपर्यंत त्या समाधि अवस्थेतच होत्या. पुढें या वरळीच्या बांधकामाच्या वेळी त्यांनी असा स्वप्नांत दृष्टांत देऊन आपली पाण्यांतून सुटका करून घेऊन योग्य त्या स्थळीं पुन्हां त्या येऊन राहिल्या आहेत. अशाप्रकारें भक्तांच्या रक्षणासाठीं त्या क्षीरसागरांतून अवतीर्ण झाल्या आहेत असें म्हणावयास हवें. मुंबईतील अनेक जमातींची ही देवता कुलदैवत आहे.

## मंदिरांची रचना

हें महालक्ष्मीचे मंदिर टेकडीवर असून मंदिरांत चढून जाण्यासाठीं ३२ पायऱ्या लागतात. त्या चढून गेल्यावर एक फरसबंदी लागते. ती ओलांडून पुढें गेले कीं देवालयाचा विशाल सभामंडप लागतो. या सभामंडपात हंड्या नि झुंबरें लटकलेलीं आहेत. या सभा मंडपातून सरळ आंत गेले कीं मुंबापुरींतील साऱ्या साऱ्यांना रुपेरी चौरंगावर अधिष्ठापित होऊन दर्शन देत असलेल्या या पूर्वाभिमुख धनदेवता महालक्ष्मीचें दर्शन होतें नि मन सुप्रसन्न होऊन जातें. या देवी महालक्ष्मीच्या एका बाजूस महाकाली नि दुसऱ्या बाजूस महासरस्वति अशा तिच्या दोन बहिणी आहेत. देवीचा संपूर्ण देव्हारा लांकडी असून त्यावर चांदीचा पत्रा ठोकला असून तो मोठ्या सुबकतेनें कोरलेला आहे. देव्हाऱ्यासभोंवतालच्या लांकडी मखरीस ॲल्युमिनियमचा रुपेरी रंग दिलेला आहे. देवीच्या या खोलीस उत्तरेकडे एक व दक्षिणेकडे

एक असे दोन दरवाजे आहेत. पाठीमागें मात्र दरवाजा नाहीं. असें हें देऊळ पूर्वाभिमुख आहे. देवळाच्या सभामंडपाच्या उजव्या बाजूस ध्वजस्तंभ असून उत्सवकालांत शुभ्र किंवा भगवा ध्वज तिथें फडकत असतो. तर सभामंडपाच्या डाव्या बाजूस एका कोपऱ्यांत दीपमाळ असून उत्सवकाळांत दीपमालेची शिखरें पाजळण्यांत येतात. देवळाचें शिखर सुमारें ८० ते ९० फूट उंच आहे.

## इतर मंदिरें व समाधि

या देवळाच्या आवारांतच मयत धाकजी दादाजी या एका दानशूर नामवंत प्रभूची समाधि आहे. त्यांनें पाऊण लाख रुपये खर्च करून देवालयाच्या आवारांतच असलेलें धाकलेश्वराचें मंदिर बांधलें. याशिवाय आवारांत मयुरेश्वर, रामेश्वर, हरिनारायण, विक्रमादित्य इत्यादींची मंदिरें आहेत.

## धर्मशाळा व तलाव

या महालक्ष्मीच्या देवळांच्या अलीकडेच सुमारें ५० हातावर पण थोडेंसे खालच्या बाजूस एक फरसबंदी असून तिथें एक तलावही आहे. हा तलाव १८२४ सालीं तुळशीदास गोपाळदास यांनीं ४०००० रुपये खर्च करून बांधला. त्याची आकृति जहाजासारखी आहे. या तळ्याच्या पश्चिमेस शंकर व रणछोडजी यांचीं मंदिरें आहेत. जवळच्या कांहीं धर्मशाळेंत लोक हवेसाठीं येऊन रहातात. महालक्ष्मीच्या देवळाजवळच अगदी अलिकडें एक धर्मशाळा बांधली गेली असून त्यावर 'साधुबेला आश्रम' अशी पाटी लटकत आहे.

या महालक्ष्मीचें देऊळ जेव्हां बांधले गेलें तेव्हां कोळी नि दाक्षिणी लोक देवीच्या दर्शनास येत असत. परंतु गेल्या सुमारें ३० वर्षांपासून गुजराती भाविकांचीहि देवीच्या दर्शनास गर्दी लोटत असते. गुजराती लोक श्रीमंत असल्यानें त्यांनीं अनेक देणग्या नि मौल्यवान चीजा देवीस नि देवालयास दिलेल्या असल्याने देवळाच्या उत्पन्नांत पडणारी भर वाढली आहे.

## पूजाअर्चा

दरदिवशीं देवी महालक्ष्मीची चार वेळां षोडषोपचारें पूजा केली जाते नि चार वेळां तिला अनन्यभावें ओवाळले जातें. देवालय सकाळीं ५ वाजतां उघडण्यांत येतें. नंतर पूजा करण्यांत येऊन पहिली आरती ७-३० च्या सुमारास होते. दुसरी धुपारती सूर्यास्ताचे वेळीं होते. तिसरी दिपारती ७-३० वाजतां नि रात्रीं १०-३० वाजतां शयनारती केली जाते. या चारी आरत्यांच्या वेळेला गुजराती श्लोक म्हटला जातो. "जय आद्या शक्ति मां, अखंड ब्रह्मांड नि पाया पडवे पंडित मां, जयो जयो मां जगदंबे" या त्या गुजराती मंगल श्लोकाच्या सुरवातीच्या पंक्ति होत. नवरात्र व दसरा नि दिवाळी या हिंदूंच्या मोठ्या सणप्रसंगीं देवळांत मोठा उत्सव करण्यांत येतो. विशेषतः नवरात्रांतील उत्सवप्रसंगीं मोठी यात्रा भरून देवीच्या दर्शनार्थ हजारों भक्त भाविकांची एकच गर्दी उडून जाते. विशेषतः आश्विन शुद्ध अष्टमीच्या दिवशीं नवविवाहित वधूंची होणारी गर्दी तर पहाण्याजोगीं असते. महाराष्ट्रीय चित्तपावन ब्राह्मण समाजात नव-विवाहीत वधूनें लग्न झाल्यापासून पहिली पांच वर्षे सौभाग्यादि ऐश्वर्य प्राप्तीसाठीं आश्विन शुद्ध अष्टमीच्या दिवशीं श्री महालक्ष्मीचें व्रत करण्याचा प्रघात आहे. तो आज शेंकडों वर्षे चालू आहे. हें व्रत काम्य व्रत असल्यानें ज्याचें त्यानेंच करावयाचें असतें. या व्रतांत प्रदोषकाळीं श्री महालक्ष्मीची पिष्टमय म्हणजे तांदळाच्या पिठाच्या मूर्तीची पूजा करून रात्रौ पुजोत्तर देवीच्या मूर्तिपुढे धूप जाळून देवता जाग्रति करणे आणि घागरी फुंकून नृत्य करणें हा व्रतोत्सवाचा महत्वाचा भाग समजला जातो. दारिद्य, विनाश व संपत्ति लाभ हा या व्रताचा हेतु आहे. तेव्हां हें व्रत करून साक्षात् महालक्ष्मीच्या दर्शनार्थ नववधूंची गर्दी जमणें सहाजिक आहे.

## एक संकट

१९५० साली या देवळावर दरोडा पडला होता. चार दरोडेखोरांनीं पहांटेस देवळांत शिरून, पुजाऱ्यांवर गोळीबार करून, सुमारे चार पांच

हजारांचा ऐवज लांबविला. हे चारी दरोडेखोर पंजाबी नि मुसलमान होते. या चोरांना पकडून त्यांना योग्य ती शिक्षा देण्यांत आली होती.

## साठ टक्के उत्पन्नाचा लोकोपयोगी संस्थासाठीं उपयोग

या महालक्ष्मीच्या देवळाचें वार्षिक उत्पन्न अंदाजें दोन लाख रुपये आहे. या प्राप्त उत्पन्नाच्या ६० टक्के रक्कम मुंबईतील कांहीं शिक्षण संस्थांना, रुग्णालयांना नि लोकोपयोगी कार्य करणाऱ्या संस्थांना दिली जाते. येथील पुजाऱ्यांना कांहीं विशेष हक्क नि अधिकार देण्यांत आलेले असले तरी देवळाच्या व्यवस्थेच्या बाबतींत मात्र त्यांना कोणताच हस्तक्षेप करतां येत नाहीं. या देवळाच्या विश्वस्तांत मुंबईचे प्रख्यात डॉक्टर श्री. के. एस. म्हसकर, सुप्रसिद्ध माजी न्यायाधीश श्री. जे. एम्. बॅरोट, ऑनररी न्यायाधिश श्री. डी. सी. वैद्य व प्रो. व्ही. जी. राव, शेट श्री. धरमदास हरगोविंदास यांसारखी थोर नि खरोखरीच जातीनें लक्ष घालणारी मंडळी असून व्यवस्थापक म्हणून श्री. घनःशाम आत्माराम सातवळेकर हे काम पहात असतात. गेलीं ३७ वर्षें ते या पदावर आहेत. या देवळाकडे बी. व ओ. च्या कोणत्याही रूटनें जातां येतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११३८९

# विविधस्वरूपी, देशव्यापी
# महामाया - दुर्गा

मानवी मन उत्सवप्रिय आहे आणि या साजऱ्या केल्या जाणाऱ्या उत्सवांतून देवदेवतांना विशेष महत्व दिलें जाते. आमचा भारत हा भक्तिमार्गी देश आहे. अनेक थोर संत महंताची पावनभूमी आहे, अन् यामुळेंच कीं काय जवळ जवळ सर्वच देवदेवतांचे उत्सव या देशांत मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. परंतु या देशांत दिवाळी आणि गणपती या सणांच्या खालोखाल जो उत्सव धूमधडाक्यानें साजरा केला जातो त्याचें नांव आहे 'नवरात्रौत्सव.' आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून आश्विन शुद्ध नवमीपर्यंत हा नवरात्रौत्सव अपूर्व उत्साहानें देशांत सर्वत्र साजरा होत असतो, आणि या नवरात्रांत सृष्टिची आदिशक्ति महामाया जगत् जननी दुर्गामाता महालक्ष्मी हिची अनन्यभावें पूजा अर्चा केली जाते. या नवरात्रांत देवीचें स्मरण, दर्शन, पूजन पुण्यदायक, लाभदायक नि फलदायक असल्याचें देवी महात्म्य, देवी भागवंत, दुर्गासप्तशति इत्यादि पुराण ग्रंथांतून कथन केलेलें आहे.

सृष्टिचें पालन करणाऱ्या अशा या जगत् जननी, देवी, मातेची या भारतांत परम पवित्र अशी कांहीं स्थानें, निवासस्थानें आहेत. हीं स्थानें देवीचीं निवासस्थानें असल्यामुळेंच कीं काय जागृत देवस्थानें म्हणून भारतभर तीं प्रसिद्ध आहेत. याठिकाणीं नवरात्रांत भेटी दिल्यानें शतकोटी पुण्याचे फल पदरीं पडतें अशी भाविकांची दृढ श्रद्धा आहे.

भारतांत या शक्तिदेवी दुर्गामातेचीं एकंदर एक्कावन स्थानें आहेत व तीं सारीं परमपवित्र समजलीं जातात. हीं स्थानें ५१ च कां याबद्दल एक मोठी रंजक कथा आहे.

सत्ययुगाच्या आरंभाला प्रजापति दक्षाने एक विशाल यज्ञ केला. यज्ञ-प्रसंगीं उपस्थित राहाण्यासाठीं दक्षाने सर्व देवांना आमंत्रण दिलें. परंतु शिव व पार्वती या दोघांना त्यानें आमंत्रण दिलें नाही. परंतु आमंत्रण नसतानांही पार्वती आपल्या पित्याच्या घरच्या यज्ञसमारंभ प्रसंगी हजर राहिली. वडलांनी कांही तिचें योग्य स्वागत केलें नाहीं. इतकेंच नव्हे तर शंकराची तिच्या पुढ्यांत निर्भत्सना केली. आपल्या पतिराजाची निंदा पार्वतीला सहन झाली नाही आणि तिथल्या तिथें तिनें यज्ञकुंडात उडी घेतली. शिवजींना जेव्हां ही वार्ता कळली तेव्हां ते दक्षाच्या घरीं आले आणि त्यांनी दक्षाचा वध केला, व पार्वतीचें शव खांद्यावर घेऊन उन्मत्त होऊन ते नाचूं लागले. भगवान विष्णूंनी जेव्हां शंकराचें तें तांडवनृत्य बघितलें तेव्हां त्यांनी आपल्या सुदर्शन चक्राने पार्वतीच्या त्या प्रेताचें ५१ तुकडे केले. हे तुकडे जिथें जिथें जाऊन पडले त्या त्या ठिकाणीं देवीची निवास-स्थानें तयार झाली. कांजिवरम येथें तिच्या अस्थी, प्रयागांत हाताची बोटें, नेपाळांत मांडी, सुगंधा येथें नासिका, वैद्यनाथ येथें हृदय अशाप्रकारें एकंदर ५१ ठिकाणीं तिच्या शरीराचें अवयव जाऊन पडले. तेव्हांपासून तो आज-पर्यंत हीं स्थानें परमपवित्र म्हणून ओळखली जात आहेत. त्या स्थानांचे महत्व असे—

## बंगालमधील काली माता

बंगालमध्यें जरीं सिंहवाहिनी, सर्वमंगला, तारासुंदरी, हजार भुजा-काली अशी देवीची अनेक मंदिरें आहेत. परंतु त्या सर्वांत कालीमातेचें मंदिर हें अत्यंत प्रसिद्ध आहे. या मंदिरात मुक्तकेशरी, रक्तांबरा आणि मुंडमालिनी या देवतांच्या पण मूर्ति आहेत. स्वामी रामकृष्ण परमहंस आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांना कालीमाता प्रसन्न होती. नवरात्रांत या कालीमातेचें बंगालमध्यें विशेषत्वानें पूजन अर्चन स्मरण केलें जातें. दिवाळीच्या दिवसांतहि हिचें दर्शन केलें असतां लक्ष्मीची प्राप्ति होते अशी समजूत आहे. भारतांत असलेल्या देवीच्या सर्व मंदिरापैकीं हौऱ्यापासून

पांच मैलांवर कालीघाट येथें असलेलें हें कालीमातेचें मंदिर सर्वांत पुण्यस्थल म्हणून ओळखलें जातें.

## योगमाया आणि कालिका देवी

दिल्ली राजधानींत श्री योगमाया आणि श्री कालिकादेवी अशीं दोन महामंदिरें आहेत. ४२ फूट उंच असें श्री योगमायाचें मंदिर लोहस्तंभापासून ६०० फूटांवर आहे. या देवीची आराधना सर्व प्रथम युधिष्ठिरानें केली. पृथ्वीराज चौहान पण या देवीचा परमभक्त होता.

श्रीकालिकामंदिर दिल्लीपासून सहा-सात मैलांवर आहे. या मंदिराच्या प्रवेशद्वारावर दोन प्रचंड सिंहमूर्ति असून आंत देवीजीची मूर्ति आहे. विविध वस्त्रालंकारांनीं तिला दररोज नटविलें सजविलें जातें. या देवीच्या देवळांत अखंड दीप तेवत असतो.

## गंगादेवीचें मंदिर

मध्यप्रदेशांत सागर येथें चकरा घाटावर गोंडांच्या विशाल किल्ल्याच्या पाठीमागच्या बाजूस गंगादेवतेचें मंदिर आहे. हें मंदिर अति प्राचीन असून किती तरी चमत्कारिक, विचित्र गोष्टींकरितां भारतभर प्रसिद्ध आहे. सागर जिल्ह्यांतल्या सर्वच स्त्रियांची गंगादेवतेवर असीम श्रद्धा आहे. देवीची संगमरवरी मूर्ति बघतांच मन मोहून जाते. तलावाला लागूनच असल्यामुळें कीं काय या मंदिराचें सौंदर्य द्विगुणित झालें आहे. गंगापूजनाच्या सोहळ्याचे वेळीं भाविक दूरून दूरून या देवीच्या दर्शनास येत असतात.

## विंध्यवासिनी देवी

प्रयागजवळ विंध्याचल नामक स्थान आहे तिथें या विंध्यवासिनी देवीचें मंदिर आहे. आदिवासी या देवीला आपली इष्टदेवता मानतात. त्यांचे प्रत्येक मंगल कार्य या देवतेच्यासमोर केलें जातें. शुंभ व निशुंभ या दोन महाभयंकर अशा राक्षसांचा वध या देवीनें केला अशी समजूत आहे. वसुदेव बालक श्रीकृष्णाच्या जागीं बंदीखान्यांत देवकीच्या जवळ तिलाच नेण्यांत आलें होतें. कंसमामानें जेव्हां तिलाच कृष्ण समजून ठार मारण्याकरितां

शस्त्र उपसलें तेव्हां ती वीज बनून आकाशांत निघून गेली होती. ही देवी म्हणजे दुर्गादेवतेचें स्वरूप आहे असें मानतात.

## देवी कुडिका

मद्रास शहरांत साहूकार पेठेंत कुडिकादेवीचें मंदिर आहे. मद्रासी लोकांची या देवीवर भारी श्रद्धा आहे. कुडिका मातेसमोर आल्यावर तोंडावर मुटके मारून घेणें आणि आपले कान पकडून थयथय नाचणें असा या देवतेला वंदन करण्याचा तिथें प्रघात आहे.

## अछरू माता

उत्तर प्रदेशांत टिकमगढ नांवाचा एक जिल्हा आहे. त्या जिल्ह्यांत पृथ्वीपुर नामक एक गांव आहे. या गांवापासून सुमारें चार-पांच मैलांवर अछरूमाताचें प्रसिद्ध मंदिर आहे. वसंत पंचमीच्या सुमारास महिनाभर तिथें यात्रा भरते. या देवीच्या दर्शनाकरितां देशाच्या कोना-कोपऱ्यातून लोक येतात. अछरूमातेच्या मूर्तिसमोर एक छोटेंसें कुंड आहे. तें सदैव पाण्यानें भरलेलें असतें. हें कुंड किती खोल आहे याचा थांगपत्ता अद्याप कुणालाच लागला नाही. अछरूमातेला वंदन केल्यावर त्या जलकुंडांत आपोआप बुडबुडे उठतात नि पाण्यावर प्रसाद येऊन तरंगतो. प्रत्येक दर्शनार्थीला सारखाच प्रसाद मिळत नाहीं. तर कुणाला खोबऱ्याचें तुकडे, कुणाला मनुका, कुणाला केळे तर कुणाला धणें असा निरनिराळा प्रसाद मिळतो हें विशेष होय. त्याच ऋतूत मिळणाऱ्या वस्तू प्रसादांत मिळतात असे नव्हे तर देवीच्या कृपेमुळें थंडीच्या दिवसांत सुद्धां कलिंगडाचा तुकडा प्रसादादाखल मिळतो. या अशा चमत्कारामुळें देवीवर लोकांचे अगाध प्रेम नि श्रद्धा आहे. अगदी अलीकडेच एक आश्चर्यजनक घटना येथें झाली. धाकटी जाऊ नि थोरली जाऊ यांच्यांत कडाक्याचें भांडण झालें. थोरल्या जावेने धाकटीची एक बहुमोल वस्तू चोरली होती. भांडतां भांडतां त्या दोघी देवीजवळ आल्या. धाकट्या जावेने थोरलीला देवीच्या समोर शपथ घ्यायला लावलें. तेव्हां थोरल्या जावेने देवीला संबोधित करून म्हटलें, "माते, जर मी

धाकट्या जावेची वस्तू चोरली असेल तर माझे पोट येथल्या येथें फुटून जावे. ती हें वाक्य म्हणते न म्हणते तोंच दुसऱ्या क्षणी तिच्या पोटांत तीव्र वेदना होऊं लागल्या. तिनें चोरी कबूल केली पण आतां त्याचा काय उपयोग ? बघतां बघतां तिचे पोट फुटले ! !

## पार्वती मंदिर

अखिल महाराष्ट्रांत देवीचें जें सर्वांत प्रसिद्ध मंदिर आहे. तें म्हणजे प्रतापगडचे भवानी मातेचें मंदिर. छत्रपती शिवाजी महाराज याच देवीची उपासना करीत. त्यांच्यावर या देवीची कृपादृष्टी होती. या देवी भगवतीनेच त्यांना तलवार भेट दिली होती. त्यामुळें महाराजांचा सर्वत्र विजय होत गेला.

## हरसिद्धि देवी

उज्जैन येथें महाकाळेश्वर शिवलिंगाच्या जवळच महाराज विक्रमादित्याची कुलदेवता हरिसिद्धि देवी हिचें मंदिर आहे. या देवीने चंड–मुंड राक्षसांचा संहार केला. मंदिरातील या अकरा मुंडक्यां-संबंधी दंतकथा प्रचलित आहे ती अशी–महाराज विक्रमादित्य दर दिवशीं देवीच्या दर्शनास येत असे आणि दर बाराव्या वर्षी आपल्या हातानेच आपलें मुंडकें कापून तें देवीला समर्पण करीत असे. देवीच्या कृपेमुळेंच कीं काय त्या बिनमुंडीच्या धडाला पुन्हां नवें मुंडकें जोडलें जाई. लागोपाठ अकरा वर्षे महाराजाने हा असा उपक्रम केला. बाराव्या वर्षी मात्र धडाला नवें मुंडकें येऊन चिकटलें नाही आणि विक्रमादित्याने अशा प्रकारें इहलोक सोडला.

काशींत अनेक देवींची प्राचीन मंदिरें आहेत. परंतु त्यांत अन्नपूर्णा देवीचें मंदिराचे महात्म्य मोठें आहे.

सागर जिल्ह्यांत रानागिर, राहतगढ, गढपहरा, देवरी व हटा याठिकाणीं देवदेवतांची अनेक प्राचीन नि अर्वाचीन मंदिरें आहेत. परंतु त्या सर्वांत रानागिरच्या मातादेवीवर त्या जिल्ह्यातल्या लोकांचा जास्त विश्वास आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे: स्थलान.
........................ दि: ..................

## शांतादुर्गा आणि लयराई

जवळ जवळ चार पांचशे वर्षांपूर्वी बांधलेले गोव्यांतील शांतादुर्गांचें मंदिर अत्यंत प्रसिद्ध नि जागृत देवस्थान म्हणून समजले जातें. ही शांतादुर्गा म्हणजे पार्वतीच होय.

गोव्यांतल्याच श्री लयराई देवीच्या दर्शनास जाणारे भाविक कधींहि टांगा, गाडी किंवा इतर वाहनाच्या साहाय्यानें मुळींच जात नाहीत, तर पायीं जातात. येथें वैशाख शु. पंचमीला मोठी यात्रा भरते. या मंदिरापासून थोडसें दूर एक वटवृक्ष आहे. पंडेलोक या वृक्षाखालीं लांकडें गोळा करून ठेवतात नि तीं पेटवितात. तीं चांगली पेटली कीं यात्रिक त्या धगधगत्या लाकडांवरून अनवाणी चालत जातात. देवीच्या कृपेमुळें त्यांना कोणत्याही प्रकारची इजा होत नाही.

नैनिताल जिल्ह्यांतल्या पूर्णागिरी पीठ मंदिरातल्या देवीचें दर्शनार्थ चैत्र नि नवरात्रांत दूर दूरुन लोक येत असतात. येथील देवीच्या विहिरींत जर कोणती अमंगल, अपवित्र वस्तू टाकली रे टाकली कीं विहिरीतला पाण्याचा प्रवाह बंद होतो. याठिकाणीं मंदिर अथवा इमारत नाही. एका लहानशा चबुतऱ्यावर लिंग नि त्रिशूळ यांची मांडणी असून जवळच अनेक वर्षांपूर्वींपासूनचा जुना सुकलेला वटवृक्ष आहे. हा कुणी देवीचा भक्त असावा अशी समजूत आहे.

## जागेश्वरी मातेचें मंदिर

मुगावली स्टेशनापासून कांही अंतरावर चंदेरी नामक एक प्रसिद्ध देवस्थान आहे. येथें जागेश्वरी मातेचें मंदिर आहे. तें पाहाण्याकारता लाबून लांबून लोक तिथें येतात. हें मंदिर अतिप्राचीन असून तें जागृत आहे असा बोलबोला आहे. या मंदिरासंबंधीची दंतकथा अशी—हजारो वर्षांपूर्वी महाराज कूर्म चंदेरीचे शासक होते. त्यांच्या सर्वांगावर कोड होतें. एकदां महाराज शिकारीकरितां गेले असतां दाट जंगलांत आले. त्यांना भारी तहान लागली. पाण्याचा शोध करतां करतां निर्मळ पाण्यानें भरलेलें एक कुंड आढळलें.

त्यांतलें पाणी प्राशन केल्यावर त्यांच्या शरीरावरचें कोड पार नष्ट झालें. थोड्याच वेळांत त्या कुंडांतून १२ वर्षांची एक रूपवान कन्या प्रकटली. महाराज जवळ जातांच ती अंतर्धान पावली. रात्रौ महाराज निद्राधीन असतां ती पुन्हां प्रकटली नि म्हणाली, "शिशुपालानें केलेल्या यज्ञस्थानीं प्रकट व्हावें अशी माझी इच्छा आहे तर तूं माझ्या मंदिराची तिथें स्थापना कर. परंतु एक गोष्ट लक्षांत ठेव. ९ दिवसपर्यंत मंदिराचें दरवाजे उघडावयाचें नाहीत."

दुसऱ्याच दिवशीं महाराजांनीं भव्य मंदिर बांधून त्याची दारें बंद केली आणि मन न राहून कीं काय तिसऱ्या दिवशीं त्यानें मंदिराचें दरवाजे उघडले. उघडतांच श्री जागेश्वरी विंध्याचल पर्वताच्या विशाल खडकांमधून प्रकट झाली. तिनें आपल्या मुखकमलाचेंच काय तें दर्शन दिलें. बाकीचा सारा देह त्या खडकांतच गुप्त राहिला. जागेश्वरी मातेचें तेजस्वी स्वरुप आजही इतकें अप्रतिम आहे कीं मूर्तिवरून इतरत्र दृष्टी फिरवावीशीहि वाटत नाहीं.

## गुजरातेतील श्री अंबाजी नि महाकाली

गुजरातेत अभयमाता, अडुसूया, खोडियारमाता, रुद्राणी नि महालक्ष्मी अशी शक्तिदेवींची पीठें आहेत. त्यामध्यें आरासुरी अंबिकाजी, पावागडची श्रीमहाकाली व श्री बालबहुचराजी या मुख्य देवता होत. श्री अंबिकाजीचें मंदिर आरासुर पर्वतावर आहे. पर्वत श्वेतरंगाचा आहे नि मंदिर पण संगमरवरी आहे. यामुळें गुजराती लोक देवीला "धोळा गढवाली" या नांवानें पुकारतात. श्रीकृष्णाचें जावळ नि श्रीकृष्णानें केलेलें सुभद्राहरण याच ठिकाणीं झालें. अंबाजी म्हणजे पार्वती. रजस्वला स्त्रीनें जर मंदिरात प्रवेश केला तर या मंदिरातला त्रिशुळ गदगद हालूं लागतो. महाराणा प्रताप या देवीचा उपासक होता. या देवीच्या कृपेमुळेंच अकबर बादशहानें घातलेला वेढा तो मोडूं शकला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें२ स्थलप्रत.
अनुक्रम ................... वि: ....................
क्रमांक ................... नों. दि. ....................

देवीने राण्याला दिलेली तलवार आजही मंदिरांत व्यवस्थित ठेवून दिलेली आहे.

श्री महाकालीचें मंदिर बडोद्यापासून ३० मैलांवर पावागड या ठिकाणीं असून तें समुद्रसपाटीपासून २८३० फूट उंचीवर आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदेस तिथें मोठी यात्रा भरते व नऊ दिवसपर्यंत मोठा उत्सव करण्यांत येतो. देवीसमोर चाललेल्या गरबा नृत्यांत एकदां स्वतः देवीने भाग घेतला होता असें सांगतात.

गुजरातेंत चुआल येथें असलेले बाला बहुचराजीचें मंदिर महाशक्ति-पीठ म्हणून प्रसिद्ध आहे. देवीने अनेक राक्षसांचे भक्षण केल्यावर अनेक ठिकाणीं तिने संचार केला आणि म्हणूनच या देवीला बहुचरी म्हणतात. या देवीचें वाहन कुक्कुट आहे. अल्लाउद्दीन खिलजी या देवीची मूर्ति फोडण्याकरितां आला होता. त्याच्या सैन्याने या देवीसमोर हिंडणारी फिरणारी कोंबडी भक्षण केली. तेव्हां ज्यांनी ज्यांनीं म्हणून तीं भक्षण केली त्या सर्वांचे पोट फोडून तीं 'कुकडूं कूं' करीत बाहेर आली अशी आख्यायिका आहे.

आज नवरात्रांत देशांत सर्वत्र पूजिल्या जाणाऱ्या अशा या महामाया भगवती पार्वती देवीला प्रणाम असो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ११३८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
वि: वि
अनुक्रम ........
नों: दि:
क्रमांक ........

REFBK-0011389